# स्कॅनडेंटची डेंटल व ईएनटी इमेजिंगसाठी विशेष सुविधा

मुंबई । प्रतिनिधी

भारताची आघाडीची डेंटल व ईएनटी इमेजिंग सोल्यूशन्स कंपनी, स्कॅनडेंटने प्रमुख ठिकाणी त्यांची इमेजिंग केंद्रे स्थापित केली आहेत. या केंद्रांमधून ते स्थानिक डेंटिस्ट व डेंटल सर्जन्सना सहयोगाने कार्य करण्याकरिता आणि ही सुविधा सर्वांना उपलब्ध होण्यासोबतच सीबीसीटी तंत्रज्ञानाला सक्षम करण्याचा प्रयत्न करतात.

३डी सीबीसीटी स्कॅन्स, २डी ओपीजी एक्स-रेज व एक्स्ट्रा-ओरल एक्स-रेसोबतच व्यापक कोन बीम सीटी स्कॅन रिपोर्ट्सचा या सुविधांमध्ये समावेश आहे. त्यांची केंद्रे डेंटल इम्प्लांटोलॉजीसाठी स्टिरिओलिथोग्राफिक ३डी मॉडेल सेवांसोबतच गायडेड सर्जरी टेम्प्लेट्सची सुविधा देतात. स्कॅनडेंटचे अत्याधुनिक कोन बीम सीटी (सीबीसीटी) तंत्रज्ञान पारंपारिक सीटी स्कॅनपेक्षा २० ते ३० पटीने कमी प्रभावी रेडिएशनसह कमीत-कमी रेडिएशन डोसेज असण्याकरिता प्रचलित आहे. यामुळे रुग्णाचा रेडिएशनशी येणारा संपर्क कमी करता येतो.